सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## ग्रामविकास विभाग, मंत्रालय,

**बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई-००१**

दूरध्वनी- (०२२) २०८२०४२४ ई-मेल-bandhkam5.rdd-mh@mah.gov.in

क्र.बैठक-२०२५/प्र.क्र.१५/बांध-५ दिनांक- १८ फेब्रुवारी, २०२५

**प्रति,**

१) जिल्हाधिकारी, नागपूर
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
३) सह सचिव, रोजगार हमी योजना विभाग, मंत्रालय
४) सह सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय

**विषय**:-शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या नागपूर पॅटर्नची माहिती घेणेसाठी आयोजित दि.१४.०२.२०२५ रोजीच्या बैठकीचे इत्तिवृत...

**महोदय,**

शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी नागपूर जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत असलेल्या "नागपूर पॅटर्नची" माहिती घेण्यासाठी शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मा. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सदर बैठकीत झालेली चर्चा व घेण्यात आलेल्या निर्णयाबाबतचे सविस्तर इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. तरी सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल विहित मुदतीत सादर करण्यात यावा, ही विनंती.

(सयाजी पाटील)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत : वरीलप्रमाणे**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव:-**

१) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
२) उप जिल्हाधिकारी (रोहयो), नागपूर
३) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, नागपूर
४)कार्यकारी अभियंता (प्र.ग्रा.स.यो), नागपूर
५)निवडनस्ती (बांध-५)

# बैठकीचे इत्तिवृत्त

**विषय:-** शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या नागपूर पॅटर्नची माहिती घेणे.

शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी नागपूर जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत असलेल्या "नागपूर पॅटर्नची" माहिती घेण्यासाठी शुक्रवार दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मा. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी नाव | पदनाम व विभाग |
|---|---|---|
| १. | श्री. सतिश चिखलीकर | सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्राम विकास विभाग |
| २. | श्री. संजय बनकर | सह सचिव, महसूल व वन विभाग |
| ३. | श्री. अतुल कोदे | सह सचिव, रोजगार हमी योजना विभाग |
| ४. | श्री. प्रशांत पाटील | उप सचिव, ग्राम विकास विभाग |
| ५. | श्री. कमलकिशोर फुटाणे | अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर |
| ६. | श्रीम. स्वाती देसाई | उप जिल्हाधिकारी (रोहयो), नागपूर |
| ७. | श्रीम. कल्पना ईखार | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, नागपूर |
| ८. | श्रीम. शालिनी कुटेमाटे | कार्यकारी अभियंता (प्र.ग्रा.स.यो.), नागपूर |

२. विषयांकित प्रकरणी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता (बांध), जिल्हा परिषद, नागपूर यांनी नागपूर जिल्ह्यामध्ये विविध योजनांच्या अभिसरणामधून शेत/पाणंद रस्त्यांची कामे कशाप्रकारे करण्यात येत आहेत याबाबतचे सादरीकरण केले. त्यानुषंगाने सविस्तर चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

| अ. क्र. | विषय | बैठकीत घेण्यात आलेला निर्णय | संबंधित विभाग | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या नागपूर पॅटर्नची माहिती घेणे. | पालकमंत्री शेत/पाणंद रस्ते योजना व मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेच्या अंमलबजावणी बाबतच्या शासन निर्णयांमधील तरतुदींचा अभ्यास करुन व प्रत्यक्षात शेत/पाणंद रस्ते तयार करताना येणा-या अडचणी विचारात घेऊन, तसेच नागपूर पॅटर्न विचारात घेऊन, सुलभ पध्दतीने दर्जेदार शेत/ पाणंद रस्ते तयार करण्यासाठी | जिल्हा परिषद, नागपूर | १५ दिवस |

| अ. क्र. | विषय | बैठकीत घेण्यात आलेला निर्णय | संबंधित विभाग | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहेत, याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.<br><br>तसेच शेत/पाणंद रस्त्याचे काम करताना मातीकाम झाल्यानंतर त्यावर ८० mm जाडीच्या खडीची Single Layer टाकून व void filling करिता ४० mm जाडीची खडी वापरुन नंतर मुरमीकरण करावयाचे झाल्यास प्रति कि.मी. करिता किती खर्च येईल, याबाबत अहवाल सादर करावा. | | |

उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

**********

**(सयाजी पाटील)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**